# प्रेसनोट

## प्रवाशांच्या बॅगा व ऐवज चोरणारा सराईत आरोपी गुन्हे शाखा युनिट ३ कडून जेरबंद
## ९७ ग्रॅम सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा तीन लाख पंचविस हजार रु.चा माल हस्तगत

स्वारगेट पोलीस स्टेशन गु.र.नं.१३६/२०१९ भा.दं.वि.क.३७९ या गुन्हयाचा तपास युनिट ३,गुन्हे शाखा,पुणे करीत असताना, पो.हवा. संतोष क्षिरसागर यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, पुणे शहरामध्ये बसमधील प्रवासी यांचेकडील ऐवज चोरी करणारा सराईत गुन्हेगार महिपाल सिंग हा स्वारगेट एस टी स्टॅन्ड परिसरात येणार आहे. अशी बातमी मिळाल्याने बातमी वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिपक निकम यांना त्यांचे आदेशानुसार युनिट ३ कडील अधिकारी व कर्मचारी यांनी स्वारगेट एस टी स्टॅन्ड पुणे येथे जाऊन सापळा रचून एस टी च्या आजूबाजूस टेहळणी करत संशयीतरित्या उभा असलेला असलेला संशयीत **महिपाल ऊर्फ मनिष रामगोपाल सिंग** वय - ३६ वर्षे रा. गगन ऐरेना सोसायटी फ्लॅट नं.सी-७०१, कडनगरचौक उंड्री ता.हवेली जि.पुणे. मुळगाव कांगडी ता. जिल्हा हरीव्दार राज्य उत्तराखंड यास पकडले आहे.

आरोपीकडे तपास केला असता त्याने त्याचे साथीदारासह पुणे शहरात गर्दीच्या ठिकाणी, विशेषतः शिवाजीनगर, स्वारगेट, पुणे स्टेशन, या भागात उभे एस टी बस, टुरीस्ट बस, तसेच पी एम पी एम एल बस मधून प्रवास करणारे प्रवासी यांचे कडील ऐवज चोरल्याची माहिती तपासात दिली आहे. त्याचे ताब्यातून ९७ ग्रॅम सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण तीन लाख पंचविस हजार रुपयेचा ऐवज हस्तगत करण्यात आलेला आहे. सौ. भारती नंदकुमार काकडे वय ४० वर्षे रा.जनता वसाहत, पर्वती ,पुणे. हया दि.७/०२/२०१९ रोजी स्वारगेट एस टी स्टॅन्ड पुणे येथे एस टी बसमध्ये चढताना त्यांचे जवळील सोन्याचे दागिणे व रोख रक्कम असलेली पर्स चोरीस गेली होती. सदर गुन्हा आरोपीने केल्याचे तपासात उघडकीस आले आहे.

आरोपी विरुध्द स्वारगेट पोलीस स्टेशनकडील एकूण ६ गुन्हे, शिवाजीनगर पोलीस स्टेशन कडील ४ गुन्हे, बंडगार्डन पोलीस स्टेशन कडील ४ गुन्हे, विश्रामबाग पोलीस स्टेशन कडील ४ गुन्हे, वारजे माळवाडी पोलीस स्टेशन व दत्तवाडी पोलीस स्टेशनकडील प्रत्येकी १ असे एकूण **१९ गुन्हे** उघडकीस आले आहेत. त्याने अशा प्रकारचे आणखी बरचे गुन्हे केल्याचा संशय आहे तसेच तो सन २०१४ मधील विश्रामबाग पोलीस स्टेशनचे गुन्हयातील फरारी आरोपी आहे. आरोपी हा सराईत व अट्टल गुन्हेगार असून यापुर्वी त्याचे विरुध्द स्वारगेट २, बंडगार्डन २, व दत्तवाडी पोलीस स्टेशन येथे १ असे गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त गुन्हे श्री. प्रदिप देशपांडे, पोलीस उप-आयुक्त श्री.शिरीष सरदेशपांडे, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे शाखा -१ श्री. समीर शेख, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. दिपक निकम, पोलीस उप निरीक्षक अजय म्हेत्रे, संजय गायकवाड, सहा.पोलीस फौजदार दिपक मते,किशोर शिंदे, दत्तात्रय गरुड, पो.हवा. संतोष क्षिरसागर, मच्छिंद्र वाळके, रोहिदास लवांडे, शकिल शेख, गजानन गाणबोटे,मेहबुब मोकाशी, रामदास गोणते, पो.ना.संदीप राठोड, अतुल साठे,संदीप तळेकर, विल्सन डिसोझा,सचिन गायकवाड, पो.शि. कल्पेश बनसोडे, यांच्या पथकाने केली आहे. गुन्हयाचा तपास पोलीस उप-निरीक्षक अजय म्हेत्रे पुढील तपास करीत आहेत.